अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.अतिमआ/आरोग्य/३८९
दिनांक :- ०३/०९/२०१८

विषय - पुणे शहर डुक्कर मुक्त करण्या बाबत घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

पुणे शहर डुक्कर मुक्त करण्याच्या दृष्टीने दि.३१/८/२०१८ रोजी संध्याकाळी ५.०० वा. मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे दालनामध्ये बैठक घेण्यात आली.सदर बैठकीस खालील अधिकारी व संबंधित उपस्थित होते.

१	मा.शीतल तेली-उगले	मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
२	मा.अनिल मुळे	उप आयुक्त मालमत्ता व व्यवस्थापन
३	मा.माधव जगताप	उपायुक्त अतिक्रमण
४	डॉ.अंजली साबणे	सहाय्यक आरोग्य अधिकारी
५	श्री.शिवाजी लंके	अधीक्षक अभियंता (भवन)
६	ॲड.निशा चव्हाण	विधी अधिकरी
७	डॉ.पी.एन.वाघ	व्हेटरनरी सुपरिटेंडेट
८	श्री.अभिजित माने	आरोग्य निरीक्षक

सदरील बैठकीत मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	विषय	दिलेले आदेश	संबंधित/जबाबदार अधिकारी
१	मोकाट डुक्करे पकडण्यासाठी अतिक्रमण विभागाने वाहने,सेवकवर्ग तसेच पोलीस बंदोबस्त करण्याबाबत.	औंध-बाणेर,घोलेरोड,वारजे-कर्वेनगर, कोथरूड-बावधन,सिंहगडरोड, धनकवडी-सहकारनगर,कोंढवा-येवलेवाडी, वानवडी-रामटेकडी,हडपसर-मुंढवा,येरवडा-कळस-धानोरी,नगररोड,वडगाव-शेरी व ढोले पाटील या क्षेत्रीय कार्यालयाकडे प्रत्येकी १ वाहन १० सेवकांसह तसेच पोलीस बंदोबस्त अतिक्रमण विभागाने दि.१०/९/२०१८ ते १०/१०/२०१८ अखेर उपलब्ध करून देण्यात यावा व सदर कारवाईवर महा.सहा.आयुक्त	मा.उप आयुक्त (अतिक्रमण विभाग) महा.सहा.आयुक्त, (सर्व क्षेत्रिय कार्यालय) विभागीय वैद्यकीय अधिकारी (झोन १ ते ५) विभागीय आरोग्य निरीक्षक आरोग्य निरीक्षक अतिक्रमण निरीक्षक

Scanned by CamScanner

		व त्यांच्या नियत्रंणा खाली विभागीय वैद्यकीय अधिकारी, विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व अतिक्रमण निरीक्षक यांचे नियत्रंण ठेवण्यात यावे.	
२	मोकाट डुक्करे पकडण्यासाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करण्याबाबत.	मे.मयूर पिगरी फार्म यांचेकडून विश्रामबाग वाडा ,भवानी पेठ व बिबवेवाडी या क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मोकाट डुक्करांची कारवाई करण्यात येणार असून त्या ठिकाणी ठेकेदार मे.मयूर पिगरी फार्म यांच्या सोबत दि.१०/९/२०१८ ते १०/१०/२०१८ अखेर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात यावा.	मा.उप आयुक्त (अतिक्रमण विभाग) महा.सहा.आयुक्त, (सर्व क्षेत्रिय कार्यालय) विभागीय वैद्यकीय अधिकारी (झोन १ ते ५) विभागीय आरोग्य निरीक्षक आरोग्य निरीक्षक
३	पकडण्यात आलेल्या डुक्करांचा साप्ताहिक अहवाल सादर करण्याबाबत.	पुणे मनपा वाहनांमार्फत तसेच खाजगी ठेकेदारामार्फत पकडण्यात आलेल्या डुक्करांचा साप्ताहिक अहवाल दर सोमवारी मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांजकडे सादर करावा.	मा.सहाय्यक आरोग्य अधिकारी मा.महापालिका सहाय्यक आयुक्त (सर्व क्षेत्रिय कार्यालय)
४	डुक्करमुक्त कारवाई दरम्यान पकडण्यात आलेली डुक्करे ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत.	मोकाट डुक्करे तात्पुरत्या स्वरुपात ठेवण्यासाठी मुंढवा-केशवनगर येथे गोठ्यां साठी आरक्षित असलेली मोकळी जागा उपलब्ध करून त्याबाबतची जागेची माहिती भवन रचना विभागास कम्पाऊड करण्यासाठी दाखविण्याची व्यवस्था करावी.	मा.उप आयुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन) मैंटेनन्स सर्वेअर (मालमत्ता व व्यवस्थापन) मा.अधीक्षक अभियंता (भवन)
५	डुक्करमुक्त कारवाई दरम्यान पकडण्यात आलेली डुक्करे ठेवण्यासाठी जागा बंदिस्त करण्याबाबत.	मालमत्ताव्यवस्थापन विभागाने निश्चित केलेली जागेवर कम्पाऊड करणे (Chain Ling) करून त्या ठिकाणी डुक्करांना खाद्य ठेवण्या साठी कायमस्वरूपी न निघणारे ड्रम्स तसेच तात्पुरत्याता पाणी पुरवठा भवन रचना विभागाने उपलब्ध करून देण्यात यावा.	मा.अधीक्षक अभियंता (भवन)

Scanned by CamScanner

६	अतिक्रमण विभागाकडून करण्यात येणाऱ्या कारवाई साठी जाळ्या उपलब्ध करून देणेबाबत.	अतिक्रमण विभागाकडून करण्यात येणाऱ्या कारवाई साठी सेवकांना कोटेशन पद्धतीने 2 लाखा पर्यंत जाळ्या खरेदी करून आरोग्य खात्याने उपलब्ध करून देण्यात याव्यात.	मा.सहाय्यक आरोग्य अधिकारी
७	वर्तमान पत्रातून जाहीर प्रकटन प्रसिध्दीस देणेबाबत.	पुणे शहरातील मोकाट फिरणारी डुक्करे काढण्या संदर्भात वर्तमान पत्रातून जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यात यावे.	मा.सहाय्यक आरोग्य अधिकारी मा.जनसंपर्क व माहिती अधिकरी मा.विधी अधिकारी
८	पुणे मनपा न्यायालयात वकीलवर्ग उपलब्ध करण्याबाबत.	डुक्कर व्यवसायिक पुणे मनपाच्या कारवाई साठी विरोध करून मनपा न्यायालयात दावे दाखल करण्याची शक्यता असल्याने न्यायालयात वकील पूर्णवेळ उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.	मा.विधी अधिकारी
९	डुक्करांना हॉटेल वेस्ट उपलब्ध करून देणेबाबत.	पकडण्यात आलेली डुक्करांना मारेपर्यंत त्यांना घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून हॉटेल वेस्ट उपलब्ध करून देण्यात यावे.	मा.उप आयुक्त अतिक्रमण विभाग मा.महापालिका सहाय्यक आयुक्त हडपसर -मुंढवा क्षेत्रिय कार्यालय
१०	मा.पोलीस आयुक्त पुणे शहर , मा.पोलीस अधीक्षक पुणे जिल्हा , मा.उप आयुक्त वाहतुक विभाग, मा.प्रादेशिक परिवहन विभाग यांना पत्रे पाठविण्याबाबत.	पुणे शहरात मोकाट डुक्करे वाहनां मार्फत न येण्याच्या दृष्टीने मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,मा.पोलीस अधीक्षक पुणे जिल्हा,मा.उप आयुक्त वाहतुक विभाग, मा.प्रादेशिक परिवहन विभाग यांनामा.महापालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात यावयाची पत्रे आरोग्य कार्यालयाने सादर करावीत.	मा.सहाय्यक आरोग्य अधिकारी

Scanned by CamScanner

११	सुरक्षा सेवक उपलब्ध करण्याबाबत.	पकडण्यात आलेली डुक्करे मुंढवा-केशवनगर या ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याने त्या ठिकाणी पुरेसा सुरक्षा सेवकवर्ग सुरक्षा खात्याने उपलब्ध करावा.	मा.सुरक्षा अधिकारी
१२	सफाई सेवक उपलब्ध करण्याबाबत व जागेची स्वच्छता ठेवणेबाबत.	पकडण्यात आलेली डुक्करे मुंढवा-केशवनगर या ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याने त्या ठिकाणी पुरेसा सफाई सेवकवर्ग उपलब्ध करण्यात यावा व त्या ठिकाणी वेळोवेळी जंतुनाशक फवारणी करण्यात यावी.	मा.महापालिका सहाय्यक आयुक्त हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय विभागीय वैद्यकीय अधिकारी झोन ४, विभागीय आरोग्य निरीक्षक झोन ४, व संबंधित आरोग्य निरीक्षक झोन ४

उपरोक्त प्रमाणे सूचना देऊन बैठक संपन्न झाली.

07.09.18

शीतल तेली-उगले

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)

पुणे महानगरपलिका

प्रत -

१. मा.उप आयुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन)
२. मा.उप आयुक्त (अतिक्रमण विभाग)
३. मा.अधीक्षक अभियंता (भवन)
४. मा.मुख्य विधी अधिकारी
५. महा.सहा.आयुक्त, (सर्व क्षेत्रिय कार्यालय)
६. विभागीय वैद्यकीय अधिकारी (परिमंडळ १ ते ५)
७. सर्व विभागीय आरोग्य निरीक्षक
८. सर्व आरोग्य निरीक्षक
९. कारवाई साठी नियुक्त केलेले अतिक्रमण निरीक्षक

यांजकडेस पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.....

Scanned by CamScanner